जा.क्र./वमवि/tissue culture/ठेका/613/२३
वनशास्त्र महाविद्यालय, दापोली
दिनांक: 22/8/२०२३

प्रति,

______________________

______________________

______________________

विषय: ठेका पध्दतीने महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर यांचेकडून प्राप्त निधी अंतर्गत **"Mass Multiplication of Manga Bamboo (*Dendrocalalmus stocksii*) by micro propagation techniques to supply quality planting material to farmers in Konkan Region"** या प्रकल्पांतर्गत कामे करण्यासाठी दरपत्रक सादर करणे.....
............

वनशास्त्र महाविद्यालयाच्या दापोली येथे उपरोक्त प्रकल्पांतर्गत कामे करावयाची आहेत. या कामांची सविस्तर यादी सोबत जोडली आहे. ही कामे ठेका पध्दतीने करून घ्यावयाची या महाविद्यालयाचा मानस आहे. ठेका नक्की करताना त्याची माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यत पोहचावी या उद्देशाने आपणास विनंती करण्यात येते की, सोबत जोडलेल्या सूचना पत्रकाला आपल्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये मोठया प्रमाणात प्रसिध्दी द्यावी. सिलबंद लखोटयातून ठेक्याचे प्रति मनुष्यशक्तीचे दर देण्याची अंतीम तारीख / /२०२३ हि आहे.

कळावे, कृपया सहकार्य करावे.

22/8

**प्राध्यापक व सहयोगी अधिष्ठाता,**
वनशास्त्र महाविद्यालय, दापोली.

प्रत: सुचना फलक, कृषि महाविद्यालय, दापोली/कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, दापोली/कुलगुरू कार्यालय, डॉ.बा.सा.कोकण कृषि विद्यापीठ, दापोली/मध्यवर्ती ग्रंथालय/सर्व विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली येथे प्रसिध्दीसाठी.

Scanned with OKEN Scanner

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
वनशास्त्र महाविद्यालय,दापोली

---

## सूचना

वनशास्त्र महाविद्यालय, दापोली हे डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचे घटक महाविद्यालय आहे. या महाविद्यालयांतर्गत **महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर यांचेकडून प्राप्त निधी अंतर्गत "Mass Multiplication of Manga Bamboo (*Dendrocalalmus stocksii*) by micro propagation techniques to supply quality planting material to farmers in Konkan Region" हा** प्रकल्प कार्यान्वित असून सदर प्रकल्पामध्ये खालीलप्रमाणे कामे करावयाची आहेत. ही कामे दि. ०१/०९/२०२३ ते २५/०३/२०२४ या कालावधीमध्ये करावयाची आहेत. अशा तऱ्हेने वरील कालावधीत ठेका पध्दतीने करावयांच्या कामाचा तपशिल पुढील प्रमाणे...

| दिनांक | कामाचा तपशिल |
|---|---|
| ०१/०९/२०२३ ते २५/०३/२०२४ | १. ऊत्तम दर्जाची रोगमुक्त झाडे निवडणे.<br>२. निवडलेल्या बेटांमधून लागवड साहित्य गोळा करणे.<br>३. मिडीया व स्टॉकस् तयार करणे व मिडीया निर्जंतुक करणे<br>४. मिडीया बनवण्यासाठी एनालेटिकल वजन काटा, PH meter, स्टरर, Distillation unit, autoclave इ. उपकरणांचा वापर करणे व त्यांच कॅलीबरेशन करणे.<br>५. विविध निर्जतुकीकरण रसायनांचा वापर करून झाडापासून घेतलेल्या ऊतींचे निर्जतुकीकरण करणे.<br>६. लॅमिनार एअरफ्लो कॅबिनेट मध्ये aseptic पध्दतीचा अवलंब करून ऊतीची मिडीया मध्ये लागवड करणे.<br>७. निवडलेल्या प्रजातींचे ऊती संवधर्नाचा पध्दती प्रयोगांद्वारे प्रमाणित करणे व ऊतीचे कृत्रिम वातावरणामध्ये संगोपन करणे.<br>८. उत्पादीत रोपांची नैसर्गिक वातावरणात लागवड करण्यापूर्वी हार्डनिंग करणे व ऊतीपासून इच्छित संख्येमध्ये झाडांचे उत्पादन करणे.<br>९. प्रयोगशाळेचे नियमित fumigation करून निर्जंतुकीकरण करणे. |

वरील कामे ठेका पध्दतीने (कंत्राटी पध्दतीने) ठेकेदारांकडून करून घ्यावयाची आहेत. या कामांसाठी मा. सहयोगी अधिष्ठाता, वनशास्त्र महाविद्यालय, दापोली हे अशा कामांचा अनुभव असणाऱ्या ठेकेदारांकडून ठेका मागवीत आहेत. ठेका सादर करताना खालील सूचनांचा विचार करून ठेका सादर करावा.

22/8

**प्राध्यापक व सहयोगी अधिष्ठाता,**
वनशास्त्र महाविद्यालय, दापोली.

Scanned with OKEN Scanner

# <u>सूचना</u>

१. ठेक्याच्या सिलबंद लखोटयावर दि. 01/09/२०२३ ते 25/03/२०२४ या कालावधीसाठी **'वनशास्त्र महाविद्यालयाचा ठेका'** असे नमूद करावे.

२. सदर ठेक्यासाठी प्रतियुनिट/मनुष्यशक्तीसाठी दर द्यावेत.

३. सदर ठेका/दरपत्रक निम्नस्वाक्षरीकार यांच्या कार्यालयामध्ये दिनांक 30/8/23 रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पोहोचेल असा देण्यात यावा.

४. अ.क्र.३ येथील कालावधीनंतर प्राप्त झालेले ठेके/दरपत्रके स्वीकारण्यात येणार नाहीत.

५. या प्रकल्पातील अधिकारी, कर्मचारी यांच्या सूचनेप्रमाणे प्रक्षेत्रावरील कामे करावयाची आहेत.

६. ठेका कार्यान्वित झाल्यापासून तो संपेपर्यंत प्रक्षेत्रावरी कामे करताना ठेकेदाराच्या मजूरांना कोणत्याही प्रकाराची इजा, जखम अपघात झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधित ठेकेदाराची राहील.

७. प्रत्येक पंधरवडयासाठी लागणा—या आवश्यक मनुष्य शक्तींची सुचना त्या त्या वेळी ठेकेदाराला दिली जाईल.

८. ठेक्यामध्ये कार्यरत असणा—या मनुष्यशक्तीची कामकाजाची वेळ सकाळी ८.०० ते १२.०० व दुपारी २.०० ते सायंकाळी ५.३० अशी राहील. या वेळेत केलेले काम एका मनुष्यशक्तीचे समजण्यात येईल. वर निर्देश केलेल्या कामांच्या कामकाजाच्या वेळेपैकी कोणत्याही एका सत्रामध्ये मनुष्यशक्ती वापरल्यास अर्ध्या मनुष्यशक्तीची मजूरी दिली जाईल.

९. ठेकेदाराने आपल्या ठेक्याचे देयक प्रत्येक महिन्याच्या एक तारखेला सादर करावयाचे आहे.

१०. प्रक्षेत्रावरील प्रयोगाची व त्या अनुषंगाने येणारी कामे वेळच्यावेळी पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत ठेकेदाराची राहील.

११. ठेक्याची कामे समाधानकारकरित्या तसेच दिलेल्या निर्देशाप्रमाणे झाली नाहीत किंवा कामामध्ये प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दिरंगाई आढळून आल्यास ठेका रद्द करण्यात येईल.

१२. एक किंवा सर्व ठेके रद्द करण्याचा किंवा स्वीकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकारांनी राखून ठेवला आहे.

2248

**प्राध्यापक व सहयोगी अधिष्ठता**
वनशास्त्र महाविद्यालय,दापोली
जि. रत्नागिरी ४१५७१२,

जा.क्र./वमवि/tissue culture/ठेका/613/२३
वनशास्त्र महाविद्यालय,दापोली
दिनांक: 22/08/23

Scanned with OKEN Scanner